# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. 77 /२०२०**

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण घेणाऱ्या युवा विद्यार्थ्यांच्या मनातील राष्ट्रभावना जागृत ठेवण्याच्या दृष्टीने, राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजविण्याकरिता व देशाभिमानाचे युवा पिढीमध्ये संवर्धन करण्याकरिता शैक्षणिक संस्थांव्दारे विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याकरिता उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्थेत विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्ययनवर्ग सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीताचे गायन करावे. त्याचप्रमाणे स्नेह संमेलने, वर्धापन दिन, समारोप समारंभ, सामूहिक उपक्रम, चर्चासत्र, शिबीर, विविध विषयांबाबतचे परिसंवाद, वादविवाद स्पर्धा इत्यादी आयोजित कार्यक्रमांची सुरुवातही राष्ट्रगीत गायनाने करण्यात यावी, असे महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.:संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६०/विशि-३, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० अन्वये कळविले आहे. तसेच प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी संदर्भ क्र.उशिसं/संकीर्ण/राष्ट्रगान/वि.शि./२०२०/२७८९, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये सदरच्या परिपत्रकातील सूचना सर्वांच्या निदर्शनास आणून देण्याची कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन परिपत्रकामधील निर्देशांचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शैक्षणिक विभाग/प्रशासकीय विभाग तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी काटेकोरपणे पालन करावे, ही विनंती.

**सोबत :-** १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.:संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६०/विशि-३, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२०.
२. संदर्भ क्र.उशिसं/संकीर्ण/राष्ट्रगान/वि.शि./२०२०/२७८९, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ 1373
दिनाकं : 13 MAR 2020

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

आपणास विनंती की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणावे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/ कायम विना अनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था तसेच तंत्र शिक्षण संचालनालयाच्या व कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणीक संस्था यातील विद्यार्थ्यांचे देनंदिन अध्ययनवर्ग सुरु होण्यापूर्वी, विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीताचे गायन करण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण - २०२०/प्र.क्र.६०/विशि-३,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक: १५ फेब्रुवारी, २०२०.

परिपत्रक:-

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण घेणाऱ्या युवा विद्यार्थ्यांच्या मनातील राष्ट्रभावना जागृत ठेवण्याच्या दृष्टीने, राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजविण्याकरीता व देशाभिमानाचे युवा पिढीमध्ये संवर्धन करण्याकरिता शैक्षणिक संस्थांव्दारे विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

(१) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/ विना अनुदानित/कायम विना अनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था, तसेच तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्ययनवर्ग सुरु होण्यापूर्वी, विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीताचे गायन करावे.

(२) स्नेह संमेलने, वर्धापन दिन, समारोप समारंभ, सामूहिक उपक्रम, चर्चासत्र, शिबीर, विविध विषयांबाबतचे परिसंवाद, वादविवाद स्पर्धा इत्यादी आयोजित कार्यक्रमांची सुरुवात राष्ट्रगीत गायनाने करण्यात यावी.

(३) सर्व संचालक व संबंधीत विद्यापीठे यांनी त्यांच्या अधिनस्त महाविद्यालये/तंत्रनिकेतने/ परिसंस्था यांना उपरोक्त सूचना आपल्या स्तरावरुन तात्काळ कळविण्यात याव्यात. तसेच सर्व महाविद्यालये/तंत्रनिकेतने/ परिसंस्था यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

२. उपरोक्त निर्देशांचे सर्व शैक्षणिक संस्थांकडून काटेकोरपणे पालन करण्यात यावे. याबाबत संबंधित संस्थेचे प्राचार्य/ सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांनी वैयक्तिक लक्ष देऊन खात्री करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२००२१७१७२६४३४६०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सतिश तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
३. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे, जि. रायगड.
५. कुलसचिव, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
६. कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
७. कुलसचिव, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
८. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
९. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०.संचालक, कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
११.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१२.उप सचिव (विशि/मशि/ताशि/साशि), उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३.निवड नस्ती (विशि-३).

28 FEB 2020
2152

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक /क्र.आर/ 1281
दिनांक - 27.02.2020
जावक दिनांक - 28/2/2020
विभाग - SO/Acad-I NT/Gen.


महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्चशिक्षण)
महाराष्ट्र राज्य , मध्यवर्ती इमारत, पहिला मजला,पुणे-४११००१.

www.dhepune.gov.in Email.vishi.dhepune@nic.in


क्र-उशिसं/संकीर्ण/राष्ट्रगान/वि.शि/२०२०/ 2747 दि-२४.२.२०२०

प्रति,

१) मा.सहसंचालक,
उच्चशिक्षण, सर्वविभाग,

२) कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,

**विषय-उच्चशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषि विद्यापीठ, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वंय अर्थसहायित विद्यापीठे, आणि सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था यातील विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्ययनवर्ग सरु होणपूर्वी राष्ट्रगीताचे गायन करण्याबाबत.**

संदर्भ-१.शासन परिपत्रक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६०/दि.१५.फेब्रुवारी,२०२०

वरील विषयानुसार कळविण्यात येते की, महाराष्ट्रातील उच्चशिक्षण घेणा-या युवा विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रभावना जागृत ठेवण्याच्या दृष्टीने, राष्ट्रीय एकात्मकतेची भावना रुजविण्याकरीता व देशाभिमानाचे युवा पिढीमध्ये संवर्धन करण्याकरीता शैक्षणिक संस्थाद्वारे विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

त्याकरीता उच्चशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषि विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वंय अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्थेत विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्ययन वर्ग सुरु होण्यापूर्वी, विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीताचे गायन करावे, तसेच स्नेह संमेलने, वर्धापन दिन, समारोप समारंभ, सामाहिक उपक्रम, चर्चासत्रे, शिबीर, विविध विषयांबाबतचे परिसंवाद, वादविवाद स्पर्धा इत्यादी आयोजित कार्यक्रमांची सुरुवात राष्ट्रगीत गायनाने करण्यात यावी, अशा सूचना संदर्भिय परिपत्रकानुसार दिल्या आहेत.

तरी सदरच्या परिपत्रकातील सूचना सर्वांच्या निदर्शनास आणून देण्याची कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती. सोबत संदर्भिय परिपत्रकाची प्रत जोडली आहे.

( सुधशं दुसाने )
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय (उच्चशिक्षण)
महाराष्ट्र राज्य , पुणे.१

27/02

प्रत,मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.३२ यांना सविनय माहितीस्तव सादर

SINHGAD TECHNICAL EDUCATION SOCIETY'S
# SINHGAD ACADEMY OF ENGINEERING
[ Affiliated to Savitribai Phule Pune University & Approved by AICTE ]
S. No. 40, Kondhwa - Saswad Road, Kondhwa(BK.), Pune - 411048. Tel. (D): 020 67571115
• Tel. (O): 020 67571116 • Tele Fax : 020 67571115 • E-mail : saeprincipal@sinhgad.edu • Website: www.sinhgad.edu

Sinhgad Institutes

Prof. M. N. Navale
M.E. (Elect.), MIE, MBA
FOUNDER - PRESIDENT

Dr. (Mrs.) Sunanda M. Navale
B.A., M.P.M., Ph.D.
FOUNDER - SECRETARY

Dr. Kishor P. Patil
M.E., Ph.D
PRINCIPAL

This is to declare that document related to singing of National Anthem for the Institutes affiliated to Savitribai Phule Pune University (Former Pune University) received from Savitribai Phule Pune University, in **Marathi** version with document reference number 77/ 2020 under the outward number AN/1373 dated 13 Mar 2020 by Registrar of SPPU.

**Savitribai Phule Pune University (Former Pune University)**
**Circular No. 77/ 2020**

It is informed by the Department of Higher and Technical Education, Maharashtra state vide its circular No.(In Marathi) Sankirn/2020/Pra. Kra. 60/ Vishi/3, dated 15th Feb 2020. Also it is informed to bring the directives conveyed by the Administrative officer, Directorate of Education (Higher Education), Maharashtra State, Pune-1, vide reference No. (Letter in Marathi) U. Shi. San/ Sankirn/Rashtragan/ Vi.Shi./2020/2079, dated 24th Feb 2020.

For sensitization of nationalism, for inculcating the spirit of national integrity and for nurturing the passion of patriotism in the category of young students undertaking higher education , the educational institutes have to undertake special efforts. For which the students of the following institutes should sing, the National Anthem before commencement of learning sessions from all Non-agriculture Universities, all Deemed Universities, all Self Financed Universities and all Government/Private Aided/Unaided/ Perpetual Unaided as well as Model Degree Colleges and Educational Ecosystems under the jurisdiction of Directorate of Higher Education. As well as in the beginning of the programs viz. Social Gatherings, Anniversary days, Farwell functions, Public programs, Seminars on variety of subjects, Group Discussions, Camps, debate competitions etc.

It is requested to inform all the concerned vide this circular that the directives included in the above mentioned Government circular should be strictly implemented by the Educational Departments/ Administrative Departments as well as all the affiliated colleges and university approved educational ecosystems.

Enclosed herewith:

1. Department of Higher and Technical Education, Government of Maharashtra State, Governement Circular No. (in Marathi) Sankirn/2020/Pra. Kra. 60/ Vishi/3, dated 15th Feb 2020

2. U. Shi. San/ Sankirn/Rashtragan/ Vi.Shi./2020/2079, dated 24th Feb 2020

**It is translated version of SPPU, Circular for Singing of National Anthem.**

Document in Regional language Translated to English

SINHGAD ACADEMY OF ENGINEERING PUNE - 48. STES

PRINCIPAL
SINHGAD ACADEMY OF ENGINEERING
Near PMC Octroi Post
Kondhwa-Saswad Road, Kondhwa (Bk.),
Pune - 411 048.